# महात्मा गांधीचे सामाजिक कार्य

- प्रा.डॉ.रामचंद्र मुंजाजी भिसे
सहयोगी प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग प्रमुख
दिगंबरराव बिंदु महाविद्यालय भोकर जि. नांदेड

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्याचा लढा सुरू केला. याबरोबरच त्यांनी भारताचा पूर्ण दौरा करून येथील जनतेला जीवन जगत असतानाच्या अडचणी व समस्याही जाणून घेतल्या. भारतीय जनतेला इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जशी स्वातंत्र्य लढ्याची आवश्यकता आहे. तसेच त्यांच्या जीवनमानात सुधारण घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न करून सामाजिक कार्य करावे लागेल हे महात्मा गांधीच्या लक्षात आले. त्यांनी २० व्या शतकातील पहिल्या दशकात म.गांधीनी सामाजिक कार्याबद्दल आपले विचार मांडले. सामाजिक कार्याच्या दृष्टीने नैतिक, वैश्विक आणि एकात्मिक दृष्टीकोनाचा विचार मांडून आपल्या कार्याला सुरूवात केली. महात्मा गांधीच्या सामाजिक कार्याविषयी थोडक्यात आढावा प्रस्तुत लेखातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय समाज व्यवस्थेचा आढावा घेतला तर ब्रिटीशपूर्व कालखंडात येथे पारंपारिक समाजरचनेत संयुक्त कुटुंबपध्दती, जातीसंस्था, जातपंचायत, ग्रामपंचायत, संस्थानिक, या सर्वांची जनतेवर नियंत्रण होते. संस्थानिक व राजा मार्फत आपल्या राज्यातील गरिब जनतेची सेवा करण्यासाठी धर्मसंस्था मार्फत धर्मशाळा चालवण्यात येत होत्या. भारतात ब्रिटीश आगमनानंतर त्यांनीही ख्रिस्ती धर्मदायी संस्था मानवतावादी दृष्टीकोनास उदयास आलेल्या होत्या. परंतु पूढे भारतात सरंजामदारी, औद्योगिक क्रांती, उद्योगधंदे विकास यामुळे समाजात अनेक स्तर निर्माण होवून त्यांची प्रश्न भिन्न भिन्न स्वरुपाची होवून पुढे आली. विकासासाठी हा अडथळा समजला जावू लागला. त्यामुळे त्याचे कल्याण झाले पाहिजे. त्यासाठी कल्याणकारी धोरणे तयार करणे त्यांची अंमलबजावणी करण हे कार्य सुरू झाले. त्यासाठी स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, लोककल्याणाची यंत्रणा यामधून सामाजिक कार्यास प्रारंभ झाला. परंतु हे व्यावसायिक समाज कार्याला सुरूत झालेली आपणास दिसून येते. सामाजिक कार्यात गांधीप्रणित जे सेवाभावीवृत्ती ठेवून अस्तीत्वात असलेले सामाजिक कार्य व व्यावसायिक सामाजिक कार्य हे दोन प्रवाह सामाजिक कार्यासाठी पुढे आलेले दिसून येतात. व्यावसायिक सामाजिक कार्याला १९३६ पासून भारतात प्रारंभ झालेला दिसून येतो ? सामाजिक कार्याला प्रारंभ झाला असला तरी

महात्मा गांधीनी मात्र सामाजिक कार्याची संकल्पना स्वतंत्र मांडून सामाजिक कार्याचा विचार मांडला. महात्मा गांधीनी समाजकार्य या संकल्पनेची मांडण त्यांनी वेगवेगळ्या स्तरातील व्यक्तीच्या विकासासाठी केली. समाजघटकांच्या उद्धारासाठी केलेले प्रयत्न आणि त्यांचे अनुभव यांच्या आधारे केलेली आहे. १८ कलमी रचनात्मक कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन परिस्थितीचा आढावा घेतला आहे. महात्मा गांधीच्या सामाजिक कार्यातून विषमतेची दरी दूर करण्याचा विचार प्रामुख्याने मांडण्यात आला. विषमतेची दरी कमी करून सामाजिक समता प्रस्थापित करणारा हा विचार होता. त्या वृत्तीनेच त्यांनी सर्वोदय सारख्या सिध्दांताची ही मांडणी केलेली दिसून येते. सर्वोदय म्हणजेच सर्वांचे कल्याण व सर्वांचा विकास हा अर्थ गांधीजींनी संगितला. भारतात समाजकार्याला प्रारंभ केला.

**महात्मा गांधीनी भारतात केलेले समाजकार्य :** दक्षिण आफ्रिकेवरून आल्यानंतर महात्मा गांधीनी सतत दोन वर्षे फिरून भारतीय समाजातील समस्या व प्रश्न जाणून घेवून ते सोडविण्यासाठी आपणास समाजकार्य व राकारण या दोन्ही प्रकारचे कार्य करावे लागेल. ते कार्य त्यांनी हाती घेतले. निर्मल कुमार बोस म्हणतात, भारतीय समाजात सामाजिक व राजकिय स्वरुपाचे असंख्य प्रश्न होते नागरी हक्क, गव्हर्नर जनरलचे कौन्सिल आणि विधी मंडळाचे सदस्यत्व, आय.सी.एस. परीक्षेची परवानगीचा प्रश्न आणि होमरुलचा प्रश्न म्हणजेच राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न इ. महत्त्वाचे प्रश्न होते. जातीभेद, अस्पृश्यता, हिंदू-मुस्लीम ताणतणाव, निरक्षरता, मागासलेली खेडी, इ.प्रश्न होते. हे प्रश्न सोडवण्यासाठी महात्मा गांधींनी ३०-३२ वर्षे समाजकार्य व राजकारण केले. या माध्यमातून समाजातील सर्व घटकाचा विकास कसा साधता येईल हा प्रमुख हेतू होता. काही निवडक चळवळीचा आढावा घेतला तर त्यामध्ये चम्पारण्याचा लढा, खेडा येथील शेतकरी लढा, अहमदाबाद येथील गिरणी कामगार लढा, अस्पृश्यता निर्मुलनाचा प्रश्न, हिंदु-मुस्लीम प्रश्न, ग्रामस्वराज्य, कृषीप्रधान अर्थव्यवस्था, स्वयंपूर्ण खेडे आदी उपक्रम राबवून सामाजिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न सातत्याने केलेला दिसून येतो. तसेच काही आश्रम सुरू करुन ही कार्य महात्मा गांधीनी केलेले आपणास दिसून येते.

**सत्याग्रह आश्रम, अहमदाबाद (१९१५) :** गुजरात मधील त्यांचे मित्राच्या सहकार्याने अहमदाबाद मध्ये आश्रम सुरु केला. गुजराती मातृभाषेचा वापर केला. हातमाग केंद्र त्यांनी तेथे सुरू केले. खादी उत्पादनाची सुरूवात या आश्रमात सुरू झाली. आश्रमात स्त्री-पुरूष मिळून २५ लोक होते. १३ तामिळ होते बाकीचे वेगवेगळ्या प्रांतामधून आलेले होते.

महात्मा गांधीनी या आश्रमातून सामुदायिक स्वयंपाकगृह, भोजनगृह, शाकाहारी स्वयंपाक, मातृभूमीची सेवा, सत्य, अहिंसा, चोरी न करणे, अपरिगृह, स्वदेशी लढा इ. सुरू केले. तसेच अस्पृश्यता निर्मुल्नासारखे सामाजिक कार्य देखील सुरू केल. ठक्करबाप्पा यांनी केलेल्या सूचनेनुसार आश्रमात दुधाभाई नावाच्या मागासवर्गीयास प्रवेश दिला. त्यामुळे आश्रमात अनेक प्रश्न निर्माण झाले. आश्रमास येणारी आर्थिक मदत थांबली. आश्रमात आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. परंतु अंबालाल साराभाईनी आश्रमास आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी १३०००/- रूपये मदत केली. हिंदस्वराजमध्ये सांगितल्याप्रमाणे आश्रमातून लोकांसमोर पर्यायी जीवनपध्दती व त्यांचे प्रयोग समोर ठेवले. गांधीजींनी खरे सामाजिक कार्य या आश्रमाच्या माध्यमातून सुरू केले.

**चंपारण्याचा लढा:** चंपारण्याचा लढा हा निळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी करण्यात आला. निळ उत्पादक शेतकरी राजकुमार शुक्ल यांनी गांधीजीकडे या शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष घालून त्यांचा प्रश्न सोडवावा यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे गांधीजीने कायदेशीर असलेली जिल्हाबंदी मोडून चंपारण्यात शेतकऱ्याकडे त्यांच्या प्रश्नासंबंधी चर्चा करण्यासाठी गेले. निळ उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न समजून घेवून आपल्या आंदोलनातून त्यांनी सरकारला त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी भाग पाडले.

तसेच शेतकऱ्याचे प्रश्न हे अज्ञानामुळे निर्माण होत आहेत. हे लक्षात आल्यानंतर त्यांनी स्वयंसेवक तयार करुन शेतकऱ्याचे अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. गांधीजीनी शेतीसंबंधी औद्योगिक शिक्षण देण्याची ही व्यवस्था केली. डॉ.देव यांच्यामार्फत चांगले आरोग्य शिक्षण दिले. चंपारण्याच्या रचनात्मक कार्यासाठी महाराष्ट्र व गुजरात येथून स्वयंसेवक

व कार्यकर्ते आणले. डॉ.राजेंद्रप्रसाद सारखे सहकारीही याच चळवळीतून मिळाले.

**खेडा आंदोलन :** खेडा आंदोलनही गुजरात मधील शेतकऱ्यांसाठी त्यानी केले. १९१८ ला दुष्काळ पडलेला होता त्यामुळे शेतकरी अडचणीत असताना सरकारने शेतसारा वसूल करण्याचा आदेश काढला. जमिन जप्त करणार असे सांगितले. महात्मा गांधींनी अभ्यास करून शेतकऱ्याची मागणी योग्य आहे. शेतकऱ्याकडून वसूल होणारा शेतसारा एक वर्षभर वसूल करू नये अशी मागणी गांधीजींनी केली. शेतकऱ्यांना संघटीत करण्यासाठी कस्तुरबा गांधी, विठ्ठलभाई पटेल यांना मदत केली. खेडा सत्यागृहात हजारो शेतकरी सहभागी झाले. जमीन जप्त झाली तरी चालेल परंतु सारा भरणार नाही अशी घोषणा केली. वल्लभभाई पटेलांसारखे नेतृत्व या लढ्यातून मिळाले.

**कामगारासाठी लढा:** कामगाराचे प्रश्न व लढ्यामध्ये ही गांधीजींनी सहभाग घेतला. १९१७-१८ मध्ये अहमदाबादमध्ये जी प्लेगची साथ आली. त्या काळात कामगारांना गिरणी मालकाकडून बोनस देण्यात आले. नंतर ते कमी करण्यात आले. याविरूध्दचा लढा कामगारांनी सुरू केला. कामगार व गिरणी मालक यांच्यात गांधीजींनी मध्यस्थी करून ३५ टक्के वाढ देण्यास गिरणी मालकास तयार झाले नाही. उपोषणाचा मार्ग वापरुन २१ दिवस उपोषण सुरू ठेवले. अखेर गिरणी मालकांना ही मागणी मान्य करावी लागली.

**साबरमती आश्रम व वर्धा आश्रम :** महात्मा गांधीजीची ग्रामस्वराज्याची संकल्पना राबवण्यासाठीच या दोन्ही आश्रमाची व्यवस्था केली. सर्व जाती धर्म एकत्रीकरण करणे हाच उद्देश होता. सर्व प्रकारचे श्रम करणे, स्वत: लागणाऱ्या वस्तुचे उत्पादन करणे, सुतकताई आणि ग्रामोद्योग, घरबांधणी, शेती कामे, जातीभेद, धर्मभेद न करणे, अस्पृश्यता न पाळणे, पुस्तकी शिक्षणाऐवजी श्रम, शिक्षण, धंदे शिक्षण यांची सांगड घालणे इ. प्रकारचे शिक्षण देवून लोकांना स्वत:च्या पायावर कसे उभे राहता येईल याबद्दल सांगितले जात असे.

**अस्पृश्यता निर्मुलन :** अस्पृश्यता निर्मुलनाचे कार्य ही त्यांन केले. अहमदाबाद आश्रमातून अस्पृश्य कुटुंबास प्रवेश दिला. हरिजनाच्या वस्तीला ते भेट देत असत. शिक्षणाचे महत्त्व अस्पृश्यांना ते सागत असत. स्वच्छता विषयी ही जागृती करत् अस्पृश्यांना असलेली मंदीर प्रवेश बंदी उठवली पाहिजे यासाठी त्यांनी सत्यागृह केला. सर्वोदयाच्या माध्यमातून कार्य केले. हरिजन सेवक संघाची स्थापना करुन पूर्ण देशभर कार्यकर्तेचे जाळे निर्माण केले. गोलमेज परिषदेतून अस्पृश्य प्रश्न मांडण्यात आला. ग्रामसफाई नारा दिला. अशाप्रकारे अस्पृश्यता निर्मुलनाचे सामाजिक कार्य त्यांनी केले.

**सारांश :**

महात्मा गांधीनी वेगवेगळ्या टप्प्यामधून ही सामाजिक कार्याची जबाबदारी पूर्ण करीत आपले स्वातंत्र्य लढ्यासाठीचे मोठे संघटन उभे केले. शेतकरी, कामगार, अस्पृश्य यांचे प्रश्न सा जेक कार्यातून त्यांनी सोडवलेले आहेत. आश्रमाच्या माध्यमातून लोकजीवन कसे बदलत येते याचे हे महत्त्वपूर्ण उदाहरण ठरलेले दिसून आले.

**संदर्भ :**

१) शिंदे देवानंद (२०१२) व्यावसायिक समाजकार्य 'शिक्षण व व्यवसाय', डायमंड प्रकाशन, पुणे पृ.१०७.

२) मोहन करमचंद गांधी (२००७) 'विधायक कार्यक्रम' नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद, पृ.२०-३०.

३) बोस निर्मलकुमार (१९७३) गांधी कार्य व विचारप्रणाली (मराठी अनु.) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.१४०.

४) साबळे दत्ता, चंपारण्याचा लढा, गांधीजींचे तंत्र आणि लोक महात्मा गांधी अभ्यासकेंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ.४४ ते ४८.

५) Tendulkar D.G. (Reprint 1969) Vol. 1. P.219, 221.

****